मंगळवार, ४ सप्टेंबर २०१८

तरुण भारत

# दोडामार्ग वक्तृत्व स्पर्धेत प्रियांका गवस प्रथम

वार्ताहर
दोडामार्ग

मुंबई येथील फोरम फ्री एंटरप्राईज पुरस्कृत ५४ वी ए. डी. श्रॉफ मेमोरियल वक्तृत्व स्पर्धेत लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात झाली. स्पर्धेत प्रियांका हनुमंत गवस हिने प्रथम क्रमांक पटकाविला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थकारणातील घडामोडींची जाणीव व्हावी, या उद्देशाने फोरम ही स्पर्धा घेते. स्पर्धेत निकिता समर्थ हिने द्वितीय, तर वीणा गवस हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन दोडामार्ग ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या मंगला वाघमोडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. त्यांच्या सोबत प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील, मांगले, खडपकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेची प्राथमिक फेरी घेण्यात येऊन अंतिम फेरीसाठी एकूण नऊ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यात पहिल्या तीन क्रमांकांना प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देण्यात आली. उत्तेजनार्थ दोन क्रमांकांना प्रशस्तीपत्रे देण्यात आली. स्पर्धेसाठी आर्थिक विषयावरील पाच विविध विषय निश्चित करण्यात आले होते. इंग्रजी, मराठी व हिंदी माध्यम सादरीकरणासाठी पर्याय देण्यात आले होते. परीक्षक म्हणून अनिल मांगले, प्रा. सोपान जाधव, प्रा. श्रीपाद पाडगावकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. संजय खडपकर यांनी, आभार प्रीती प्रसादी यांनी तर सूत्रसंचालन डॉ. शंभूदेव दरेकर यांनी केले.



**दोडामार्ग : हळबे विद्यालयात वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या प्रियांका गवसचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करताना मान्यवर.** लवू परब